# दि कल्याण जनता सहकारी बँक लि. (मल्टीस्टेट शेडयुल्ड बँक)
## ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

रविवार दि. १७.०९.२०१७ रोजी बँकेची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नवरंग बँक्वेट हॉल, फोर्टीस हॉस्पिटलजवळ, बैलबाजार, कल्याण (प.) येथे सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

ठीक सकाळी १०.०० वाजता गणसंख्या १२९ होती. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी जाहीर केले की, सभेस आवश्यक ती गणसंख्या नसल्याने सभा अर्धा तास तहकुब केली जात आहे. सदर सभा अर्ध्या तासानंतर म्हणजे ठीक १०.३० वाजता भरेल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. त्यानंतर ठीक सकाळी १०.३० वाजता सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन सभेची सूचना वाचून दाखविली. तसेच अहवालातील मुद्रणदोष सांगितले. सदर सभा तहकुब होऊन तिचे कामकाज सुरु झाले असल्याने, कायद्यानुसार फक्त विषयपत्रिकेवरील विषयच सभेत चर्चेस घेतले जातील, असे सूचित केले.

सभेच्या सुरुवातीस मा. अध्यक्ष ॲड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी सर्व सभासदांचे स्वागत केले व बँकेचे दि. २४.०३.२०१७ रोजी मल्टीस्टेट सहकारी बँकेत रुपांतर झाले असल्याचे सांगितले. आपला नोंदणी क्रमांक आता - MSCS/CR/१२७२/२०१७ असा झाला आहे व आपणांस आता Multistate Co-operative Societies Act २००२ हा दि. २४.०३.२०१७ पासून लागू झाला आहे. साहजिकच यंदाची वार्षिक सर्वसाधारण सभा (Annual General Meeting) ही मल्टीस्टेट कायद्यातील तरतुदीनुसार व बँकेचे नव्याने पारीत झालेल्या उपविधीनुसार होत आहे. या बदलामुळे सभेच्या कामकाजात बदल झाले आहेत. वार्षिक सर्वसाधारण सभेतील विषय पत्रिकेमध्ये बदल झाला आहे. विषयपत्रिकेतील विषयदेखील Multistate Co-operative Societies Act २००२ ह्या कायद्यानुसार पारीत झालेल्या उपविधीनुसार घेण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा व मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी ॲक्ट यातील तरतुदींनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त ३० दिवसांच्या आत मंजूर करावे लागते. त्यानुसार दि. ११.०९.२०१६ रोजीच्या संचालक मंडळाने दि. १४.०८.२०१६ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर केले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी कायद्यानुसार वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेत कायम करायला ठेवावे लागत असे. परंतु मल्टीस्टेट कायद्यानुसार, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजामध्ये 'इतिवृत्त कायम करणे' व 'आयत्या वेळचे विषय' या विषयांचा समावेश नाही. त्यामुळे या विषयांचा अंतर्भाव सभेच्या कामकाजात नाही. मागील वर्षीची सभा राज्य सहकारी कायद्यांतर्गत झाली असल्याने त्याचे इतिवृत्त माहितीसाठी दिले आहे. Multistate Co-operative Societies Act २००२ ह्या कायद्यानुसार आजच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संचालक मंडळ सभेत कायम करुन ३० दिवसांच्या आत म्हणजेच दि. १७.१०.२०१७ पासून आपल्या वेबसाईटवर उपलब्ध होईल.तसेच छापील प्रती बँकेच्या शाखांमध्ये उपलब्ध होतील. Multistate Co-operative Societies Act २००२ ह्या कायद्यानुसार बँकेच्या कामकाजावर व सभेच्या कामकाजात झालेले अन्य बदल बँकेचे तज्ज्ञ संचालक मा. श्री. सचिन आंबेकर त्यांच्या विवेचनात स्पष्ट करतील.

बँकेस मल्टीस्टेट दर्जा प्राप्त झाल्यामुळे पूर्वीचे Maharashtra State Co-op. Act मधील कलम १०१ व ९१ नुसार वसुलीसाठी कारवाई करता येणार नाही. Multistate Co-operative Societies Act २००२ ह्या कायद्यानुसार वसुलीची कारवाई लवादामार्फत केली जाते. सहकार आयुक्त कार्यालय यांनी बँकेचे लवाद म्हणून ॲड. धन्यकुमार तळणकर यांची नेमणूक केली आहे. लवकरच त्याचे कामकाज सुरु होईल.

दरवर्षीप्रमाणे ह्यावर्षीही काही सभासदांनी लेखी प्रश्न विचारले होते. त्यांना बँकेने लेखी स्वरुपात उत्तरे दिली आहेत. त्या सभासदांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. श्री. शेखर सीताराम बर्वे, प्रा. नागप्पा सिध्दप्पा कुल्लूर, श्री. विजय विठ्ठल मराठे, श्री. जयंत गणेश दामले, श्री. अरुण ओंकार शिंपी. यावेळी काही सभासदांनी विषय पत्रिकेतील समाविष्ट विषयासंदर्भात प्रश्न उपस्थित केले. त्यास मा. अध्यक्षांनी समर्पक उत्तरे दिली.

यानंतर मा. अध्यक्षांनी बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांना अहवाल सालात देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्ती व सभासद यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सूचित केले व सर्वांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहण्याची विनंती केली.

**ठराव क्र. १ : दुखवटयाचा ठराव -**

अहवाल सालात ज्या मान्यवरांचे व सभासदांचे निधन झाले त्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून ही सभा श्रध्दांजली वाहत आहे.

केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री - अनिल दवे, तामिळनाडुच्या मुख्यमंत्री - जे. जयललिता, ज्येष्ठ अभिनेते व खासदार -विनोद खन्ना, माजी केंद्रीय मंत्री व काँग्रेस नेते -बाळासाहेब विखे पाटील, माजी केंद्रीय मंत्री - ई. अहमद, पंजाबचे माजी मुख्यमंत्री - सुरजीतसिंग बर्नाला, माजी आमदार व मुंबईचे महापौर - डॉ. रमेश प्रभु, राष्ट्रसेविका समितीच्या तृतीय प्रमुख संचालिका - उषाताई चाटी, इस्त्रोचे माजी अध्यक्ष, अणुवैज्ञानिक - एम्. जी. के. मेनन, प्रसिध्द लेखक - डॉ. आनंद यादव, विनोदी लेखक व नाटककार - तारक मेहता, लेखक व कवी - दिलिप चित्रे, लेखिका व कवियत्री - शिरिष पै, ज्येष्ठ अभिनेते, लेखक व दिग्दर्शक - प्रा. मधुकर तोडरमल,ज्येष्ठ पत्रकार व लेखक - चो. रामस्वामी, ज्येष्ठ पत्रकार व ख्यातनाम विचारवंत - दिलीप पाडगावकर, ज्येष्ठ पत्रकार व संपादक - गोविंदराव तळवलकर, आग्रा घराण्याचे ज्येष्ठ गायक व बंदिशकार - पं. बबनराव हळदणकर, कर्नाटक संगीताचे अभ्यासक व ख्यातनाम गायक - एम्. बालमुरली कृष्ण, जयपुर अत्रोली घराण्याच्या ख्यातनाम गायिका, पद्मविभुषण - किशोरी अमोणकर, ज्येष्ठ रंगभूषाकार - कृष्णा बोरकर, सुप्रसिध्द अभिनेते - ओम पुरी, ख्यातनाम अभिनेत्री - रिमा लागू, अभिनेत्री - अश्विनी एकबोटे, ज्येष्ठ नेपथ्यकार - बापू लिमये, ख्यातनाम व्यंगचित्रकार - वसंत सरवटे, एअर मार्शल अर्जनसिंग.

# दिवंगत सभासदांची यादी

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १. | ५५३१७ | गाडगीळ वसुधा अशोक | ११.०२.२०१६ |
| २. | ४८८१८ | नाक्ती विलास नारायण | १४.०४.२०१६ |
| ३. | ५६१७१ | शिवेश्वरकर शुभदा केशव | २३.०४.२०१६ |
| ४. | १०४९८ | विध्वंस सुरेश सखाराम | २४.०४.२०१६ |
| ५. | १९३७४ | फडके सुधा विष्णू | ३०.०४.२०१६ |
| ६. | ३३१४७ | शिंदे आशा निर्मळ | ०२.०५.२०१६ |
| ७. | ५०८२२ | राव रामदास नामदेव | ०२.०५.२०१६ |
| ८. | २६८३ | गुधाटे विलास खंडेराव | ०४.०५.२०१६ |
| ९. | ६३३३ | नरोडे कमलाकर तुकाराम | ०६.०५.२०१६ |
| १०. | ५७२२४ | पगारे नितीन सुधाकर | ०७.०५.२०१६ |
| ११. | ५०२७ | वैद्य मदन दत्तात्रय | ११.०५.२०१६ |
| १२. | १८०४७ | ओडवाला निलेश ईश्वरभाई | १२.०५.२०१६ |
| १३. | १८१४४ | वाणी शांताराम शंकर | २२.०५.२०१६ |
| १४. | ३२७९३ | फुलवारे आत्माराम नागो | ३०.०५.२०१६ |
| १५. | ३४०२१ | तावडे योगिता संतोष | ३१.०५.२०१६ |
| १६. | १६४५९ | पंजाबी अमरलाल लक्ष्मणदास | ०३.०६.२०१६ |
| १७. | ७९७१ | पाटील कोंडू धोंडू | ०६.०६.२०१६ |
| १८. | १९११७ | जोशी पद्माकर अवधूत | १९.०६.२०१६ |
| १९. | ७८३१ | रामचंद्रन एस | १९.०६.२०१६ |
| २०. | २६३२३ | अगस्ती पद्मावती शरदचंद्र | २३.०६.२०१६ |
| २१. | १६०५७ | दंडगवाळ प्रभाकर शंकर | २४.०६.२०१६ |
| २२. | २९६८१ | चव्हाण प्रकाश दामू | २४.०६.२०१६ |
| २३. | १२४९५ | उगले रामनाथ कारभारी | २५.०६.२०१६ |
| २४. | ३३४७ | खराडे मनोहर रामचंद्र | २८.०६.२०१६ |
| २५. | २४९२९ | बनसोडे शामराव नारायण | ०३.०७.२०१६ |
| २६. | १४८२२ | वालोदरा शारदा राजेश | ०४.०७.२०१६ |
| २७. | १२१८४ | सोनावणे बन्सीलाल काशीनाथ | ०५.०७.२०१६ |
| २८. | ३३४०२ | पटेल प्रवीण मगन | ०५.०७.२०१६ |
| २९. | ४४६४१ | विष्णू आर एस | ०८.०७.२०१६ |
| ३०. | २०२५८ | घोडके अशोक माणकेश्वर | १०.०७.२०१६ |
| ३१. | ४६२६५ | बोरवणकर सुधा प्रमोद | ११.०७.२०१६ |
| ३२. | २१४९ | पाठक सुशिला श्रीकृष्ण | १४.०७.२०१६ |

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ३३. | ३२०९८ | साळुंके सुर्यकांत दशरथ | २३.०७.२०१६ |
| ३४. | ४४०७९ | चांचलानी आसनदास आत्माराम | २६.०७.२०१६ |
| ३५. | १०६६८ | नेरुरकर अनंत लक्ष्मण | २७.०७.२०१६ |
| ३६. | १३३०० | कोनकर वासुदेव दत्तात्रय | २९.०७.२०१६ |
| ३७. | ३१३ | दातार माधवी महादेव | २९.०७.२०१६ |
| ३८. | २२१०४ | लिमये मधुकर गोंविद | ०४.०८.२०१६ |
| ३९. | ३६८०१ | पाटील चंद्रकांता गोकुळ | ०४.०८.२०१६ |
| ४०. | १४४१५ | चासकर गंगाधर खंडू | ०८.०८.२०१६ |
| ४१. | ४९७८८ | सिधवानी चंद्रा लाधाराम | ११.०८.२०१६ |
| ४२. | २७४८५ | कापडीया हातीम आदमअली | २२.०८.२०१६ |
| ४३. | २२५७७ | तिरोडकर मंदाकिनी गणपत | २६.०८.२०१६ |
| ४४. | ४२४०० | कुलकर्णी रमेश रघुनाथ | २८.०८.२०१६ |
| ४५. | ४८८१ | तावडे संजीव गजानन | ०६.०९.२०१६ |
| ४६. | ४१६८४ | दुर्वे अरविंद वासुदेव | २०.०९.२०१६ |
| ४७. | २७००४ | राजाध्यक्ष वनिता वसंत | २१.०९.२०१६ |
| ४८. | ३३९४९ | भास्करन अय्यन | २४.०९.२०१६ |
| ४९. | ४६४१७ | लब्रे रमेश मारुती | २४.०९.२०१६ |
| ५०. | ५२७८० | पाटोळे श्रीकांत शंकर | ११.१०.२०१६ |
| ५१. | ३०५०३ | बेली अब्राहम पीटर | १७.१०.२०१६ |
| ५२. | ७८७ | घाटणेकर भास्कर दत्तात्रय | २४.१०.२०१६ |
| ५३. | १०११२ | माडेकर पुष्पा मुरलीधर | ३१.१०.२०१६ |
| ५४. | ४३७७६ | चिकणे संदिप प्रकाश | ०३.११.२०१६ |
| ५५. | २७२११ | शिंदे सुंदर सटवाजी | ०७.११.२०१६ |
| ५६. | २८१३४ | महाजन मालती एकनाथ | १५.११.२०१६ |
| ५७. | ५१४३९ | कुलकर्णी रजनी दिगंबर | १५.११.२०१६ |
| ५८. | ३२७४४ | बापट बाळकृष्ण काशिनाथ | २१.११.२०१६ |
| ५९. | ३४९ | कर्वे सुमन नारायण | ०३.१२.२०१६ |
| ६०. | ४०५५० | महाजन काशिनाथ गणपत | २४.१२.२०१६ |
| ६१. | ७३४६ | जोगळेकर पुष्पलता जनार्दन | २५.१२.२०१६ |
| ६२. | १२९३८ | लिमये परशुराम कृष्णाजी | २६.१२.२०१६ |
| ६३. | २८०८ | जोशी रमेश दत्तात्रय | २७.१२.२०१६ |
| ६४. | ४५२९९ | धुमाळ श्रीरंग कोंडीबा | २७.१२.२०१६ |
| ६५. | ३७५६६ | पाल इंद्राणी श्यामलाल | ३०.१२.२०१६ |
| ६६. | २३३८१ | गद्रे विनायक कृष्णाजी | ०१.०१.२०१७ |

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ६७. | १९८०६ | निर्मळ संजय विष्णुकांत | ०२.०१.२०१७ |
| ६८. | ४६१६७ | पमनानी मनोहर खेमचंद | ०५.०१.२०१७ |
| ६९. | ४६२१९ | नागराणी विजय तिलोकचंद | ०८.०१.२०१७ |
| ७०. | ८४३६ | माच्छी परशुराम महादेव | ०९.०१.२०१७ |
| ७१. | १५२८९ | रनावरे ताराचंद हरीभाऊ | १०.०१.२०१७ |
| ७२. | ४०३५३ | सैंदाणकर संजय श्रीराम | १२.०१.२०१७ |
| ७३. | १९२२४ | बोडस सुलभा यशवंत | १६.०१.२०१७ |
| ७४. | २८५५ | जोशी पद्मा माधव | १९.०१.२०१७ |
| ७५. | ५७३६ | सातारकर सुरेश दत्तात्रय | २०.०१.२०१७ |
| ७६. | ५०५८९ | तिवारी प्रभाकर गोकुळप्रसाद | ०३.०२.२०१७ |
| ७७. | ४७२०० | मनसता दक्षा यशवंत | ०७.०२.२०१७ |
| ७८. | ३०९०२ | वडगामा सुषमा मगनलाल | १०.०२.२०१७ |
| ७९. | ११३८७ | जोशी रामचंद्र प्रभाकर | ११.०२.२०१७ |
| ८०. | ३४७५२ | पिंगळे सागर दिनानाथ | १३.०२.२०१७ |
| ८१. | ३८९७३ | नायर सी पी पद्मनाभन | २३.०२.२०१७ |
| ८२. | १९८६९ | हांडे नामदेव लक्ष्मण | २६.०२.२०१७ |
| ८३. | ६०३१४ | आवला संजय धनराज | ०९.०३.२०१७ |
| ८४. | ३५४०४ | मंडल रंजना महादेब | १३.०३.२०१७ |
| ८५. | ४४७०४ | पातकर मनिषा प्रदिप | १४.०३.२०१७ |
| ८६. | ७८७८ | भडसाळकर रमेश मधुसूदन | २५.०३.२०१७ |
| ८७. | २०१२ | आहेर दिनेश हरी | २७.०३.२०१७ |
| ८८. | ३५५३८ | दुरायस्वामी रामचंद्रन | ०२.०४.२०१७ |
| ८९. | ४४४५७ | घुले चंद्रकांत काशिनाथ | ०६.०४.२०१७ |
| ९०. | १३५ | कान्हेरे विद्याधर विनायक | ०१.०५.२०१७ |
| ९१. | १२३०१ | पांडे इंद्रजीत तपसी | ०९.०५.२०१७ |
| ९२. | १९९७७ | मगर लाला चिंधा | १३.०५.२०१७ |
| ९३. | २०४९५ | उपाध्याय कमलापती रामचंद्र | १५.०५.२०१७ |
| ९४. | ७४३९ | गोसावी प्रभाकर डी | १६.०५.२०१७ |
| ९५. | ९२२१ | चौधरी विलास लालू | २०.०५.२०१७ |
| ९६. | ४६५ | आपटे महेश्वर दत्तात्रय | २५.०५.२०१७ |
| ९७. | १७६९२ | दिक्षित उषा सुरेश | २६.०५.२०१७ |
| ९८. | १३४ | कान्हेरे प्रमिला विनायक | २५.०८.२०१७ |

सभासद श्री. अरुण शिंपी यांनी बँकेस जे लेखी स्वरुपात प्रश्न विचारले होते तेच प्रश्न श्री. शिंपी पुन्हा सभागृहात उपस्थित करीत होते. ह्यावर मा. अध्यक्ष यांनी असे स्पष्ट केले की, श्री. शिंपी ह्यांनी जे प्रश्न लेखी स्वरुपात विचारले आहेत. त्या प्रश्नांना बँकेने लेखी स्वरुपात उत्तरे दिली आहेत. त्यामुळे श्री. शिंपी ह्यांनी सदर प्रश्न सभागृहात उपस्थित करु नयेत. परंतु तरीदेखिल, सदर प्रश्न सभागृहात चर्चिले जावेत असा आग्रह श्री. शिंपी ह्यांनी धरला. तसेच अन्य मल्टीस्टेट दर्जा प्राप्त झालेल्या सहकारी बँका आपल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेत 'इतिवृत्त वाचून कायम करणे' व 'आयत्या वेळचे विषय' या दोन विषयांचा अंतर्भाव करीत असल्याचे सांगितले. ह्यावर श्री. जुवेकर व अन्य काही सभासदांनी श्री. शिंपी ह्यांना दुजोरा दिला. परंतु बँकेने ज्या प्रश्नांना लेखी स्वरुपात उत्तर दिलेले आहे असे प्रश्न पुन्हा सभेत उपस्थित करु नयेत असे मा. अध्यक्ष ॲड. सुरेश पटवर्धन ह्यांनी श्री. शिंपी ह्यांना सांगितले. यावेळी अनेक सभासदांनी मा. अध्यक्षांना पाठिंबा देत सभेचा वेळ वाया घालवू नये असे सुचविले.

सभासद श्री. भावसार यांनी इतिवृत्ताबाबत काही प्रश्न उपस्थित केले. परंतु सदर प्रश्न विषय पत्रिकेतील नसल्याने त्यावर चर्चा होणार नाही असे मा. अध्यक्षांनी सांगितले. सभासद श्री. कुल्लूर यांनी त्यांच्या प्रश्नांना बँकेने लेखी स्वरुपात दिलेली उत्तरे त्यांना समाधानकारक नसल्याने त्याची उत्तरे सभागृहात दयावीत अशी मागणी केली. परंतु सदर प्रश्नांना लेखी स्वरुपात उत्तरे दिली आहेत. तसेच पुढील विवेचनात ह्या प्रश्नांची उत्तरे येणार असल्याने पुन्हा पुन्हा प्रश्न उपस्थित करु नये असे श्री. कुल्लूर यांना मा. अध्यक्ष ॲड. पटवर्धन यांनी सांगितले व विषय पत्रिकेतील पुढील विषय पटलावर ठेवला.

यानंतर बँकेचे अध्यक्ष मा. ॲड. सुरेश पटवर्धन यांनी दि. ३१.०३.२०१७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल व बँकेच्या वाटचालीचा आढावा दृक्श्राव्य माध्यमातून सभेपुढे सादर केला.

**विषय : संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. ३१.०३.२०१७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या अहवालाची नोंद घेणे.**

सुरुवातीस बँकेचा एकत्रित व्यवसाय ₹ ४५४८ कोटींचे वर झाला असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. तसेच सन २०१८ पर्यंत एकत्रित व्यवसाय ₹ ४८७५ करणे हे बँकेचे उद्दिष्ट असून, त्यादिशेने बँकेची वाटचाल सुरु असल्याचे सांगितले. त्यानंतर दृक्श्राव्य माध्यमातून मा. अध्यक्षांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा सभेसमोर सादर केला.

सन २०१५-१६ मध्ये भागभांडवल ₹ ६५.८१ कोटी होते. त्यात ₹ ४.३० कोटींची वाढ होऊन सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात बँकेचे भागभांडवल ₹ ७०.११ कोटी इतके झाले आहे. ६.५३ % ने भागभांडवल वाढले आहे. राखीव निधी ₹ १३३.९७ कोटींवरुन ₹ १४८.०५ कोटी झाले आहेत. राखीव निधीत १०.५१% नी वाढ झाली आहे. २०१५-१६ मध्ये सभासद संख्या ५०९४७ एवढी होती. २०१६-१७ मध्ये सभासद संख्या २७०८ ने वाढून ५३६५५ झाली आहे.

बँकेच्या एकूण ठेवी २०१५-१६ या आर्थिक वर्षाखेरीस ₹ २३०७.६८ कोटी होत्या. त्यामध्ये वाढ होऊन २०१६-१७ आर्थिक वर्षअखेर ₹ २६७२.४१ कोटी इतक्या झाल्या आहेत. ठेवींमध्ये १५.८१% वाढ झालेली आहे.

बँकेची एकूण कर्जे २०१५-१६ अखेर ₹ १५९२.२१ कोटी होती. त्यामध्ये वाढ होऊन २०१६-१७ अखेर एकूण कर्जे ₹ १८७५.७८ कोटी इतकी झाली आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत कर्जांमध्ये १७.८१% इतकी वाढ झाली आहे.

बँकेचा निव्वळ नफा सन २०१५-१६ साली ₹ १८.१६ कोटी होता, सन २०१६-१७ यावर्षी निव्वळ नफा ₹ २०.०२ कोटी इतका झालेला आहे. नफ्यामध्ये १०.२४ % वाढ झालेली आहे.

सन २०१५-१६ साली प्रती कर्मचारी उत्पादकता ₹ ८.५७ कोटी होती त्यामध्ये वाढ होऊन यावर्षी ₹ ८.६५ कोटी इतकी आहे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार भांडवल पर्याप्तता (Capital Adequacy) प्रमाण ९% पेक्षा अधिक असले पाहिजे. बँकेने २०१६-१७ अखेर भांडवल पर्याप्तता प्रमाण १२.४२% इतके राखलेले आहे.

सन २०१५-१६ मध्ये बँकेच्या ढोबळ अनुत्पादित कर्जाचे (Gross NPA) प्रमाण ३.७३% पर्यंत होते. तर निव्वळ अनुत्पादित कर्जे (Net NPA) १.९२% होती. ढोबळ व निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ह्यावर्षी अनुक्रमे ४.१३% व २.४१% एवढे आहे. ढोबळ अनुत्पादित कर्जांचे व निव्वळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाण रिझर्व्ह बँकेच्या मापदंडानुसार मर्यादेत आहे.

आपल्या बँकेचा एकत्रित व्यवसाय (Mix Business) जर बघितला, तर तो २०१२-१३ ला ₹ २२४० कोटी झाला. २०१३-१४ ला ₹ २७१० कोटी, २०१४-१५ अखेरीस ₹ ३२४३ कोटी, २०१५-१६ अखेरीस ₹ ३८८९ कोटी तर २०१६-१७ अखेरीस ₹ ४५४८ कोटी इतका झालेला आहे.

आर्थिकदृष्टया सक्षम व सुव्यवस्थापित बँकांसाठी असलेले रिझर्व्ह बँकेचे जे मापदंड आहेत ते सभेस समजावून सांगितले. सदर सर्व मापदंड आपल्या बँकेने पाळलेले आहेत. भांडवल पर्याप्तता प्रमाण, Gross NPA, Net NPA चे प्रमाण, सतत तीन वर्षे नफा, CRR व SLR ची पातळी हे मापदंड रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार पूर्ण केले आहेत.

लेखापरीक्षण व तपासणी याबाबत माहिती देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की, मागील वर्षी दि. १४.०८.२०१६ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेने अहवाल सालाकरिता वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मे. किर्तने अँड पंडीत, एल.एल.पी या फर्मची नियुक्ती केली. मे. किर्तने अँड पंडीत, एल. एल. पी यांनी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिताचा अहवाल सादर केला असून, बँकेस 'अ' वर्ग दिला आहे.

दि. ३१ मार्च २०१७ अखेर बँकेच्या ४१ शाखा होत्या. दि. ०६ सप्टेंबर, २०१७ रोजी भिवंडी येथे बँकेची ४२ वी शाखा सुरु करण्यात आली. बँकेच्या आजमितीस एकूण ४२ शाखा असून, शाखाविस्तार ८ जिल्ह्यांमध्ये असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. तसेच पुणे येथे बँकेचे क्षेत्रीय कार्यालय अहवाल वर्षात सुरु झाले.

नोटाबंदीच्या काळात सुमारे १ लाख ४० हजार ग्राहकांनी / सर्वसामान्यांनी बँकेतील सर्व शाखांमध्ये दि. १० नोव्हेंबर २०१६ ते दि. ३० डिसेंबर २०१६ पर्यंत एकूण ₹ ३८६ कोटी जमा केले. सदर कालावधीत इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, डेबिट कार्ड आणि Demonetization याबाबत बँकेतील माहिती व तंत्रज्ञान विभागातील अधिकाऱ्यांनी सभासद प्रशिक्षण वर्गांतर्गत अनेक सभासद व ग्राहकांना मार्गदर्शन केले. तसेच Demonetization च्या काळात विविध संस्थांमध्ये बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सरव्यवस्थापक श्री. अतुल खिरवडकर यांनी

Demonetization या विषयावर अनेक व्याख्याने दिल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. तसेच Demonetization च्या काळात बँकेच्या छोट्या व्यावसायिक खातेदारांना जवळपास ३५० POS मशिन्स उपलब्ध करुन दिली असल्याचे सांगितले. ज्यायोगे रोख रक्कम व्यवहारात होत असलेली त्यांची अडचण दूर होण्यास मदत झाली.

संगणकीकरण व तंत्रज्ञान क्षेत्रातही आपली बँक मागे नसून सर्व प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञान म्हणजेच सोशल मिडीयावरील Facebook, Google+, Twitter, You-tube, Internet Banking व Mobile Banking, अधिक सुरक्षित असे ‘चीप बेस्ड रुपे डेबिट कार्ड’, E-Commerce अशा सर्व प्रकारच्या सुविधा आपण ग्राहकांना उपलब्ध करुन दिल्या आहेत.

ई-लॉबीमध्ये पैसे भरण्याचे मशीन, पैसे काढण्याचे मशीन म्हणजेच ATM Machine, Coin Vending Machine, Passbook Printing Machine व Cheque Drop Box एकाच ठिकाणी उपलब्ध करुन दिले आहे. मुख्य शाखेतही ATM मशीन सोबतच Cash Depositary Machine, Passbook Printing व Cheque Drop Box ची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

NPCI द्वारे आपल्या बँकेचे UPI Registration झाल्याची नोंद घेण्यात आली. भारत सरकारने BHIM हे ॲप आणले आहे. BHIM या ॲपमध्ये आपल्या बँकेचे नाव आहे. UPI मुळे कोणत्याही बँकेच्या खातेदाराला दुसऱ्या कोणत्याही बँकेच्या खात्यामध्ये रक्कम वर्ग (Funds transfer) करता येईल.

KYC ही संकल्पना आता नवीन नाही. CKYC म्हणजे Central KYC ही सेवा आपण लवकरच सुरु करीत आहोत. यामध्ये ग्राहकाने KYC ची कागदपत्रे सादर केल्यानंतर ती CERSAI च्या पोर्टलला upload झाल्यावर, सदर ग्राहकाला आपल्या बँकेत अथवा अन्य कोणत्याही बँकेत पुन्हा KYC ची कागदपत्रे दयावी लागणार नाही. KYC संदर्भात मा. अध्यक्षांनी सर्वांना सूचित केले की, "रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची मार्गदर्शक तत्वे आणि PMLA कायदा, २००२ तसेच मनी लॉंडरिंग प्रतिबंधक तरतुदीनुसार प्रत्येकाने खात्याची केवायसी पूर्तता करुन त्यानंतर नियमितपणे अद्ययावत करणे आवश्यक आहे. आमच्या दि. ०१ जून, २०१५ रोजीच्या पहिल्या स्मरणपत्राद्वारे खात्याची पूर्तता ३१ ऑगस्ट २०१५ च्या आत करावी अशी विनंती केली होती. परंतु असे आढळते की, काही खात्यात अजूनही पूर्तता केलेली नव्हती म्हणून आम्ही केवायसी पूर्तता न केलेल्यांना दि. ०१.०६.२०१७ रोजी पुन्हा एकदा नोटीस पाठविली होती. तसेच दि. ३१.०५.२०१७ रोजी लोकसत्ता ठाणे वृत्तांतामध्ये देखील जाहीर नोटीस प्रसिध्द केली होती. तरीही, असे आढळून येते की, जवळजवळ २२००० खातेदारांनी अजूनही केवायसी पूर्तता केलेली नाही.

केवायसी पूर्तता नसलेल्या खात्यांवरील व्यवहार भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार लवकरच स्थगित करण्यात येणार आहेत. तरी, सर्वांनी केवायसीची पूर्तता करुन बँकींग सेवेचा अखंड लाभ घ्यावा असे मा. अध्यक्षांनी सांगितले.

आपली बँक काही बँकांना माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य करते. एकूण १० बँकांना आपण तंत्रज्ञान विषयीची सेवा देतो.

बँकिंग सेवेव्यतिरिक्तही अन्य काही सेवा आपली बँक ग्राहकांना देत आहे. त्यापैकी एक म्हणजे Franking सेवा, ही काळातलाव शाखेमार्फत दिली जाते. अहवाल सालात सुमारे ७१७१३ कागदपत्रे नोंदवली असून त्यापोटी बँकेस ₹ ७.०७ लाख इतके उत्पन्न मिळाले आहे.

बँक २०११ पासून कोटक लाईफ इन्शुरन्स व २०१४ पासून दि न्यु इंडिया अॅश्युरन्स कं. या भारतातल्या सर्वात मोठया सर्वसाधारण विमा कंपनीचे कॉर्पोरेट एजंट म्हणून कार्यरत आहे. तसेच भारत सरकारतर्फे सुरु करण्यात आलेल्या प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत व प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेअंतर्गत खातेदारांनी मोठया प्रमाणात या योजनेचा लाभ घेतला आहे.

कायद्यातील तरतुदीनुसार, बँकेच्या पात्र सभासदांनाच मतदानाचा अधिकार असतो. तसेच सभासद कल्याण निधी अंतर्गत दिल्या जाणाऱ्या सवलती / योजना यांचा लाभदेखिल केवळ पात्र सभासदांनाच दिला जातो. पात्र सभासदांसाठीच्या पुढील अटी त्यांनी विषद केल्या, सलग तीन वर्षांपैकी एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे. परंतु सभासदांची अनुपस्थिती वार्षिक सर्वसाधारण सभेने क्षमापित केल्यास, ही अट लागू होणार नाही. भागभांडवल किमान ₹ १,०००/- व दि. ३१ मार्च रोजी ठेवी ₹ ५००/- किंवा कर्ज ₹ १,००,०००/- सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

मल्टीस्टेट कायद्यानुसार व बँकेच्या उपविधींनुसार अंदाजपत्रकाबाबत संचालक मंडळ निर्णय घेऊ शकते. सन २०१७-१८ या वर्षाचा व्यवसायाचा अंदाजपत्रक सादर करतांना त्यांनी सांगितले की ठेवी ₹ २,८५० कोटी व कर्जे ₹ २,०२५ कोटी व नफा ₹ २१ कोटी होईल, असा अंदाज आहे.

**पुरस्कार :** यानंतर अहवाल वर्षात बँकेला जे विविध पुरस्कार मिळाले त्याबद्दलची माहिती मा. अध्यक्षांनी सभेस दिली.

१) **"बँकिंग फ्रंटियर" या ख्यातनाम मासिकातर्फे** बँकेस Best CEO Award & Best Youth Employee Strategies Award हे दोन पुरस्कार दि. १८ सप्टेंबर २०१६ रोजी प्राप्त झाले.

**२) दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप बँक्स् फेडरेशन** यांचेतर्फे मोठया बँकाच्या गटात बँकेस 'उत्कृष्ट बँक' हा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार दि. ०६ मार्च, २०१७ रोजी प्राप्त झाला. तसेच २०१६-१७ सालासाठी सुध्दा फेडरेशनतर्फे पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**३) सहकार सुगंध मासिकातर्फे** सन २०१५-१६ च्या वार्षिक अहवालास कोकण विभागातून उत्कृष्ट वार्षिक अहवालासाठीचा प्रथम पुरस्कार दि. २६ फेबुवारी २०१७ रोजी बँकेस प्राप्त झाला.

४) **Computer Society of India** या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेतर्फे बँकेस Best Bank - Information Security Implementation' हा पुरस्कार दि. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी प्राप्त झाला.

५) **"बँको" या मासिकातर्फे** मोठया सहकारी बँकांच्या गटात बँकेस सन २०१५-१६ करिता 'सर्वोत्कृष्ट बँक' (पहिले बक्षीस) आणि Best Technology' (पहिले बक्षीस) हे दोन पुरस्कार दि. २५ नोव्हेंबर २०१६ रोजी प्राप्त झाले. तसेच ह्याच समारंभात National Payment Corporation of India (NPCI) यांचेकडून सन २०१५-१६ करिताच्या मोठया सहकारी बँकांच्या गटात बँकेस 'Best Payment System' हा पुरस्कार प्रदान प्राप्त झाला.

यानंतर बँकेने 'विद्यार्थी प्राविण्य पुरस्कार', 'धर्मादाय निधी वितरण', 'संचालक समाजसेवा पुरस्कार', 'कोन येथे व्यावसायिकांचा मेळावा' व 'अर्थसंकल्पावरील व्याख्यान' हे विशेष उपक्रम राबविले, त्याबाबतची माहिती मा. अध्यक्षांनी सभेस दिली.

सांघिकरित्या बँकेला वैभव शिखरावर नेणे हेच बँकेचे ध्येय आहे. गेली ४४ वर्षे बँक याच ध्येयाने कार्यरत आहे व यापुढेही याच ध्येयाने आपण कार्यरत राहू असा विश्वास व्यक्त करुन मा. अध्यक्षांनी सर्व सभासदांना धन्यवाद देऊन दृकश्राव्य माध्यमातील अध्यक्षीय भाषण संपवले.

सदर ठराव कायम करण्यापूर्वी काही सभासदांनी प्रश्न उपस्थित केले. सभासद श्री. उदय दीक्षित यांनी वाडेघर सुशोभिकरणासंदर्भात प्रश्न पुन: उपस्थित केला. तसेच बँक प्रगतीपथावर असताना सभासदांना देण्यात येणारा लाभांशाचा दर कमी का करण्यात येत आहे? यावर खुलासा करण्याची मागणी केली. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या कर्जाचे तपशील बँकेने सादर करावेत तसेच सर्व सभासदांना अहवाल १५ दिवस आधी घरपोच मिळण्याची व्यवस्था बँकेने करावी, असे सूचिवले. यावर उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की, श्री. दिक्षित यांच्या काही प्रश्नांची उत्तरे ही पुढे येणाऱ्या विषयाच्या विवेचनात स्पष्ट होतील. तसेच दिक्षित यांच्यावर बँकेविरुध्द बदनामीकारक वक्तव्ये केल्याबद्दल तसेच WhatsApp वरुन बँकेविरोधात संदेश पाठविण्याबद्दल कल्याण येथील न्यायदंडाधिकारी न्यायालयात Criminal Case दाखल केली आहे. त्यामुळे सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने या मुद्दयाचे उत्तर सभेत देणे संयुक्तिक होणार नाही.

सभासद श्री. गुरव, पुणे यांनी बँकेच्या पुणे, नाशिक, कोल्हापूर, सातारा ह्या जिल्ह्यांमध्ये असल्याने सर्वसाधारण सभेची वेळ ही सर्व सभासदांना सोयीची असावी, अशी सूचना केली. तसेच अहवालात नमूद केल्याप्रमाणे खेळते भांडवल व नफ्याचे प्रमाण घटत असल्याचे दिसत आहे व NPA चे प्रमाण हे RBI च्या निकषांनुसार असले तरी गेल्या तीन वर्षात ते सातत्याने वाढत आहे, यावर बँकेने विचार करुन हे प्रमाण १% ते २% पर्यंत मर्यादित ठेवण्याचे प्रयत्न करावेत असे सुचविले.

सभासद श्री. युवराज जाधव यांनी पुढीलप्रमाणे मुदे उपस्थित केले. बँकेस Multistate दर्जा प्राप्त झाल्यामुळे हा दर्जा प्राप्त होण्याच्या आधीच्या कर्जखात्यामध्ये कर्जदार व जामिनदार यांच्या सहीचे Undertaking ₹ १००/- च्या Stamp paper घेतले जात आहे. कर्ज वितरीत करताना बँक Process Fee कर्जदाराकडून वसूल करते, त्यातूनच हे ₹ १००/- वळते करावेत व त्याचा भुर्दंड कर्जदाराला लागू नये. कर्ज देताना Kotak Life ची नवीन policy घेण्याची सक्ती करु नये. Passbook Printing Machine इतर बँकांप्रमाणे अद्ययावत असावे. तसेच ग्राहकांना Passbook Printing करतांना मदतनीस म्हणून Security Guard असतात. तरी, यासाठी वेगळया कर्मचाऱ्यांची व्यवस्था करावी जेणेकरुन बँकेची सुरक्षितता धोक्यात येणार नाही.

श्री. गुरव व श्री. युवराज जाधव यांनी केलेल्या सूचनांची सभेने नोंद घेतल्याची मा. अध्यक्षांनी सांगितले.

सभासद श्री. कुल्लूर यांनी कर्ज निर्लेखनाबाबत प्रश्न उपस्थित केला. परंतु मा. अध्यक्षांनी सदर विषयासंदर्भात मा. संचालक श्री. सचिन आंबेकर यांच्या सदर विषयाबाबत विवेचनात खुलासा होईल असे सांगितले. तसेच हा विषय मांडल्यानंतर आपले काही प्रश्न असल्यास विचारावे असे सांगितले.

ठराव क्र. २ : संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. ३१.०३.२०१७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल **मा. अध्यक्ष ॲड. सुरेश पटवर्धन** यांनी सभेपुढे वाचून दाखविला. त्याचबरोबर पुढील वर्षाचे अंदाजपत्रक व नवीन व्यवसायिक उद्दिष्टे सभेपुढे मांडली. त्याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | सौ. ज्योती विठ्ठल गाढवे | सभासद क्र. १४६२३ |
| अनुमोदक : | श्रीमती. इंदू लक्ष्मण सोनवणे | सभासद क्र. २१६२७ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

यानंतरचा विषय वैधानिक लेखापरीक्षणासंदर्भात असून तो मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी, मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर यांना सांगितले.

**विषय : वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासलेला दि. ३१.०३.२०१७ रोजीचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल स्वीकृत करणे. तसेच मागील वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.**

ह्या विषयावरील विवेचन सुरु करण्यापूर्वी मा. आंबेकर यांनी सांगितले की, दि. ०८ सप्टेंबर, २०१७ रोजी जयपूर येथे Banking Frontier तर्फे आयोजित केलेल्या National Conference मध्ये मोठया बँकांच्या गटात म्हणजेच देशभरातल्या ७३ बँकांमधून आपल्या बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुरेश पटवर्धन यांना मागील दोन वर्षाच्या बँकेच्या आर्थिक कामगिरीबद्दल 'Best Chairman' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. काही व्यक्तिंनी / संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी यासंदर्भात मा. अध्यक्षांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. अभिनंदनाचा स्वीकार करताना मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, हा पुरस्कार वैयक्तिक नसून बँकेस मिळालेला आहे. One Team One Aim ह्या ध्येयाने आपण काम करीत असतो आणि हा पुरस्कार या सांघिक कामगिरीची पावती आहे. आपण सकारात्मक दृष्टीकोन ठेवून काम करीत असतो. तसेच पुढेही करीत राहू, अशी ग्वाही दिली आणि सर्वांचे आभार मानले.

यानंतर मा. श्री. आंबेकर यांनी विषय पत्रिकेवरील क्रमांक २ च्या विषयाला सुरुवात केली. सर्वप्रथम त्यांनी दि. ३१.०३.२०१७ रोजीच्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाविषयी सभेस सविस्तर माहिती दिली. ताळेबंद व नफा-तोटा पत्रकात Multistate Co-operative Societies Act २००२ च्या कलम ६३ नुसार बदल करण्यात आले. त्यामुळे यावर्षी Profit & Loss Appropriation A/c ही दिले आहे. त्याविषयी विस्तृत टिप्पणी केली. Multistate मुळे झालेल्या बदलांविषयीची माहिती अहवालात Notes to Account या सदरामध्ये दिली आहे. ताळेबंद व नफा-तोटा पत्रक सादरीकरणातील बदल खालीलप्रमाणे -

१. कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे सानुग्रह अनुदान हे मागील वर्षापर्यंत नफा-तोटा पत्रकात वेतन, इतर भत्ते व भविष्य निर्वाह निधी या सदरात समाविष्ट होते. परंतु यावर्षीपासून सानुग्रह अनुदान हे (P & L Appropriation) नफा-तोटा वाटणीमध्ये समाविष्ट केले आहे. सानुग्रह अनुदानाची जी रक्कम आहे, ती कर्मचारी व अधिकारी यांच्याबरोबर झालेल्या करारानुसार आहे.

२. मागील वर्षापर्यंत Maharashtra State Co-op. Act नुसार व वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली जी कर्जखाती निर्लेखित करावयाची असतील त्यांस वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक होती व सभेच्या मंजुरीनंतर पुढील वर्षीच्या नफा तोटा पत्रकात निर्लेखनाची नोंद दिसत असे. परंतु Multistate Co-operative Societies Act २००२ च्या Section ६२ नुसार नफा काढण्यापूर्वी निर्लेखित करावयाची रक्कम नफा तोटा खाती नावे टाकावी लागते. म्हणजे ज्यावर्षी कर्जे निर्लेखित करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळासमोर मांडला जातो, त्याचवर्षी ती रक्कम नफा-तोटा पत्रकात समाविष्ट केलेली असते. यावर्षीची आर्थिक पत्रके ही मल्टीस्टेट कायद्यानुसार केली असल्याने, निर्लेखित केलेल्या रकमेचा नफा तोटा खाती समावेश आहे. यावर्षी जी कर्जखाती निर्लेखित केली आहेत त्यात वसुली शक्य नाही किंवा नजीकच्या काळात वसुलीची शक्यता खूप कमी आहे. परंतु त्या खात्यांमध्ये वसुलीचे सर्व अधिकार अबाधित आहेत. ही सर्व कर्जखात्यांची बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी छाननी करुन ती निर्लेखित करण्यास हरकत नसल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. त्याप्रमाणे ८२० कर्जखात्यांमधील दि. ३१.०३.२०१७ रोजी येणे असलेली मुद्दल रक्कम ₹ १६.४७ कोटी निर्लेखित केली आहेत.

यावर्षीच्या ताळेबंदात Share Application Money दिसत आहे. मागील वर्षी आपण मल्टीस्टेटचा दर्जा मिळविण्यासाठी अर्ज केला होता. मल्टीस्टेट कायद्यातील तरतुदींनुसार, ज्या राज्यात बँकेला कार्यक्षेत्र वाढवायचे असते त्या राज्यातील व्यक्ती सदर बँकेचे सभासद होण्यास तयार असल्याचे व त्या बँकेच्या भागभांडवलात रक्कम गुंतवण्यास तयार असल्याबाबत declaration घ्यावे लागते. त्यानुसार सुरत मधिल काही व्यक्तिंनी आपले सभासद होण्यासाठी अर्ज दिले होते आणि त्यांनी शेअर्सची रक्कम जमा केली होती. ती Share Application Money ला ठेवली आहे. त्यानंतर ताळेबंदातील इतर बाबींचा तपशील त्यांनी सादर केला.

या विषयावर अधिक टिप्पणी करताना मा. श्री. आंबेकर यांनी सांगितले की, यावर्षात झालेले Demonetization (नोटाबंदी) तसेच नव्याने अस्तित्वात आलेला RERA कायदा याचा Banking क्षेत्रावर परिणाम झालेला दिसत आहे. नोटाबंदीच्या काळात ग्राहकांनी मोठया प्रमाणावर रोख रक्कम बँकेत जमा केली. या रकमेवर बँकेला कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळाले नाही. उलट जमा झालेल्या रोख रकमेचे व्यवस्थापन व ती अन्य बँकांमध्ये जमा करणे यावर बँकेला काही प्रमाणात खर्च करावा लागला. तसेच नोटाबंदीच्या काळात बाद झालेल्या नोटा जमा करुन घेणे या व्यतिरिक्त अन्य व्यवहार होऊ शकले नाहीत. याचा बँकेच्या व्यवसायावर काही प्रमाणात परिणाम झाला.

बँकिंग क्षेत्रामध्ये अनुत्पादित कर्जाचे प्रमाण हे सातत्याने वाढत आहे. राष्ट्रीयकृत बँकांमध्ये मोठया प्रमाणावर अनुत्पादित कर्जे वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर आपल्या बँकेचा विचार केला असता आपण ढोबळ व निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण रिझर्व्ह बँकेच्या मापदंडानुसार राखले आहे. निर्लेखित केलेल्या कर्जखात्यांमध्ये तसेच अनुत्पादित कर्जांमध्ये वसुलीचे सर्व शर्थीचे प्रयत्न बँक करणार आहे. दि. ०१.०७.२०१७ पासून लागू झालेल्या GST कायद्याचा परिणाम बँकिंग व्यवहारावर होईल असा अंदाज व्यक्त करुन मा. आंबेकर यांनी पुढील आर्थिक वर्षसुध्दा खडतर असेल असे सांगितले. अशा रितीने त्यांनी ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक सादर केले. लेखापरीक्षण अहवालाबाबत पुढील मुद्दे मांडले.

मे. किर्तने अँड पंडीत एल. एल. पी यांनी सादर केलेल्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालानुसार बँकेच्या व्यवहारात कुठलाही गंभीर दोष नाही. रिझर्व्ह बँकेचे मापदंड व अन्य कायद्याचे मापदंडानुसार आर्थिक निकषांची पूर्तता केली असल्याचे सांगितले. बँकेची Government Securities मधील गुंतवणूक तसेच Treasury विभागाची कामगिरी उत्तम झाली आहे. ठेवी व कर्जामधील वाढ समाधानकारक आहे.

तसेच लेखापरीक्षण अहवालात सातत्याने येणारे मुद्दे उदा. वाहन कर्जासंदर्भातील RC Book उपलब्ध नसणे, नूतनीकरण केलेल्या मालमत्ताचा विमा उपलब्ध नसणे, गृहकर्जासंबंधी Original Share Certificate उपलब्ध नसणे ह्या संदर्भात मा. श्री. आंबेकर यांनी खुलासा केला.

वैधानिक लेखापरीक्षणाच्या अहवालात नमूद केलेल्या बाबींचा Compliance Report बहुराज्यीय बँकेच्या कायद्यानुसार सादर करुन, वैधानिक लेखापरीक्षकांना त्यांच्याकडून तपासून झाल्यावर Multistate Co-operative Registrar, Delhi यांना सादर करण्यात येईल, असे सांगितले.

मागील वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या दोषदुरुस्तीच्या अहवालाची नोंद घेणे, हा तांत्रिक स्वरुपाचा विषय आहे. मागील वर्षीची सभा ही महाराष्ट्र राज्य सहकारी कायद्यांतर्गत झाली होती. मागील वर्षात वैधानिक लेखापरीक्षकांनी जे दोष काढले होते, त्याची पूर्तता करुन त्याबाबतचा अहवाल आपण उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे यांचेकडे वेळेत सादर केला आहे. त्याची नोंद घ्यावयाची आहे. त्यामुळे या ठरावाला मंजुरी दयावी.

यानंतर सभासद श्री. कुल्लूर यांनी निर्लेखित केलेल्या कर्जखातेदारांची यादी बँकेने सभेत सादर करावी असा आग्रह धरला. अन्य एका सभासदानेही निर्लेखित केलेल्या कर्जखात्यांचा तपशील सादर करावा यास सहमती दर्शविली. सभासद श्री. युवराज जाधव यांनी निर्लेखित केलेल्या कर्जखात्यांची माहिती सादर न करुन बँक अशा कर्जखातेदारांना पाठीशी घालत आहे व अशा तऱ्हेने बँकेतील थकीत कर्जदारांची संख्या वाढण्याची शक्यता आहे, अशी भिती व्यक्त केली. इतर बँका थकीत कर्जदारांची माहिती वर्तमानपत्रामध्ये सादर करतात त्याप्रमाणे बँकेनेही अशा थकीत कर्जदारांची माहिती सादर करावी, असे सूचविले.

या प्रश्नाचे उत्तर देताना मा. संचालक श्री. आंबेकर यांनी सांगितले की, निर्लेखित केलेल्या कर्जखात्यांची माहिती सादर न करुन, अपारदर्शकता ठेवणे किंवा कोणत्याही प्रकारची माहिती लपविणे हा संचालक मंडळाचा व बँकेचा उद्देश नाही. वसुल न होणारी कर्जखाती निर्लेखित करणे हा व्यावसायिक निर्णय आहे. परंतु बँक कायद्यांनुसार सदर कर्जखाती वसुलीचे सर्व अधिकार अबाधित ठेवून निर्लेखित करते व वसुलीचे शर्थीचे प्रयत्न चालू ठेवते. या निर्लेखनामुळे बँकेस लागू होणारे कर व ढोबळ अनुत्पादित कर्जे कमी होण्यास मदत होते. बँकेस लागू असलेल्या कायद्यानुसार सदर निर्लेखित खात्यांची माहिती बँक सादर करु शकत नाही. या विषयाबाबत आणखी दोन मुद्दे आहेत, एक म्हणजे खातेदाराचे बँकेबरोबरचे व्यवहार मग तो ठेवीदार असो वा कर्जदार हे फक्त त्या खातेदारालाच सांगता येतात. अन्य कोणाला सांगता येत नाहीत आणि या विश्वासावरच बँक चालते. दुसरा मुद्दा असा की कर्ज निर्लेखित केलेल्या कर्जदाराला, त्याचे कर्ज निर्लेखित केले आहे, हे माहित नसते. हे जर कर्जदाराला समजले तर वसुली प्रक्रियेत अडथळा निर्माण होईल. परंतु भविष्यात कायद्याने संमती दिल्यास अशा सर्व निर्लेखित कर्जखात्यांचा तपशील वार्षिक सर्वसाधारण सभेत सादर करण्यात येईल, असे सांगितले.

मा. अध्यक्षांनी सांगितले की, या विषयावर आत्तापर्यंत बरीच चर्चा झाली आहे. काही सभासदांकडून दिशाभूल करणारे वक्तव्य केले जात आहे. बँक कर्ज वसुलीकरिता सतत प्रयत्नशील असते, कर्ज वसुलीकरिता समिती अस्तित्वात आहे, त्यासंबंधी सतत पाठपुरावा केला जातो आणि बँक कोणालाही पाठीशी घालत नाही. तरीही, बँकेचे माजी ज्येष्ठ संचालक मा. श्री. प्रधान सर यांनी यासंदर्भात विवेचन करावे अशी विनंती मा. अध्यक्षांनी केली.

बँकेचे माजी ज्येष्ठ संचालक मा. श्री. प्रधान सर यांनी सभेस संबोधतांना असे सांगितले की, सध्याची Banking क्षेत्राची परिस्थिती पाहता इतर बँकांच्या तुलनेत आपल्या बँकेची प्रगती कौतुकास्पद आहे. ही प्रगती सभासदांच्या व हितचिंतकांच्या गेल्या ४४ वर्षापासून असलेल्या पाठिंब्यांने झाली आहे. सर्व सभासदांनी गेली ४४ वर्षे बँकेवर विश्वास दाखवून बँकेस जी साथ दिली ती यापुढेही द्यावी व लाभांश १५% वरुन १२% करण्याच्या संचालक मंडळाच्या प्रस्तावास सहमती दर्शवावी असे आवाहन केले. बँकेची आर्थिक स्थिती अजून बळकट करण्याकरिता उचलले हे पाऊल आहे, असे त्यांनी नमूद केले.

यानंतर मा. अध्यक्षांनी विषय क्र. ३ संदर्भातील ठराव सभेपुढे मांडला.

ठराव क्र. ३ : वैधानिक लेखापरीक्षक मे. किर्तने अँड पंडीत एल. एल. पी यांनी दि. ३१.०३.२०१७ रोजीचा तपासलेला ताळेबंद, नफातोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल **मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर** यांनी सभेपुढे मांडला व समजावून सांगितला त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे. तसेच मागील वर्षाचा वैधानिक लेखापरीक्षणाचा दोषदुरुस्ती अहवाल **मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर** यांनी सभेपुढे सादर केला. त्याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. विनायक विष्णू मालसे | सभासद क्र. १७८१६ |
| अनुमोदक : | श्री. दिलीप यशवंत फडके | सभासद क्र. २५७६८ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. आघारकर यांना सांगितले.

**विषय : संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१६-१७ सालच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.**

मा. ज्येष्ठ संचालक श्री. मोहन आघारकर यांनी २०१६-१७ सालची नफा वाटणी सभेपुढे विस्तृतपणे मांडली. बँकेस दि. २४ मार्च, २०१७ रोजी मल्टीस्टेट दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे मल्टीस्टेट कायद्यातील तरतुदींनुसार, यावर्षीची नफा विभागणी सूचविली आहे. याबद्दलचे विवेचन करताना लाभाशांचा दर हा १५% वरुन १२% करण्याची कारणमीमांसा सभेपुढे स्पष्ट केली. भांडवल पुंजी अधिक सक्षम करण्यासाठी तीव्र स्पर्धा, वाढते अनुत्पादित कर्जाचे प्रमाण, घटत जाणारे ठेवीचे व कर्जाचे व्याजदर या सर्व बाबींचा साकल्याने विचार केला आहे. काही निधी हे वैधानिक स्वरुपाचे असतात. त्याचे प्रमाण ठरलेले आहे, त्यानुसार त्याची तरतुद करावीच लागते. उदा. राखीव निधी, सर्वसाधारण मुक्त निधी, राष्ट्रीय सहकार शिक्षण निधी इ. सभासदांना लाभांशा व्यतिरिक्त सभासद कल्याण निधी आहे, त्यामधूनही काही विशिष्ट कारणांसाठी मदत केली जाते. दरवर्षी नफ्यामधून काही

रक्कम सभासद कल्याण निधी म्हणून बाजूला काढत असतो. या व्यतिरीक्त सभासदांना वैद्यकीय मदत संबंधीचा आढावा घेण्याच्या दृष्टीने एका समितीची स्थापना दि. १२.०९.२०१७ रोजीच्या संचालक मंडळ सभेमध्ये करण्यात आली. त्या समितीचे अध्यक्ष मा. डॉ. संदिप जाधव, विद्यमान संचालक हे असतील तसेच माजी संचालक मा.डॉ. कारखानीस व माजी संचालिका मा. डॉ. सौ.काटकर समितीचे सदस्य असतील. सन २०२२-२३ हे बँकेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. यावर्षात सभासद व समाजासाठी चांगले उपक्रम राबविण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे. त्यादृष्टीने महोत्सव निधीची तरतूद बँक करीत आहे. आपल्या विषयाची सांगता करताना मा. ज्येष्ठ संचालक श्री. आघारकर यांनी सांगितले की, वाढत असणारे अनुत्पादित कर्ज, हे सर्व बँकांपुढे मोठे आव्हान आहे. सरकारी बँकांना सरकार भांडवल देऊन मदत करते. तसे सहकारी बँकांबाबत नसते. त्यामुळे आपला निधी आपण वाढविण्याची आवश्यकता आहे. तसेच आपली बँक अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करते. त्यामुळे मोठी भांडवली रक्कम गुंतवावी लागते. त्यासाठी देखिल तरतूद करावी लागते. आर्थिक सक्षमता, सुदृढता आणि भविष्याच्या दृष्टीने विचार करता, सूचविलेले बदल बँकेच्या व्यावसायिक वृध्दीसाठी हितावह आहेत.

सभासद श्री. उदय दिक्षीत व श्री. कुल्लूर यांनी लाभांशाचा दर १५% वरुन १२% करणेबाबत विरोध दर्शविला.

सभासद श्री. मंगेश पाटील यांनी जागतिक आर्थिक स्थिती तसेच इतर बँकांची आर्थिक स्थिती पाहता आपल्या बँकेची कामगिरी कौतुकास्पद असल्याचे नमूद केले. तसेच बँकेचा आर्थिक पाया मजबूत करण्याकरिता लाभाशांचा दर १५% वरुन १२% करण्यास सहमती दर्शविली व उपस्थित सभासदांनाही सहमती दर्शविण्याचे आवाहन केले.

सभासद श्री. भास्कर भावसार यांनी पुढील वर्षी लाभांश दर आणखी कमी करु नये, असे सुचविले.

यानंतर सभासद श्री. प्रशांत मुल्हेरकर, श्री. उत्तम देशमुख, श्री. नीळकंठ काळे व श्री. कलगुडे यांनी बँकेवर विश्वास दाखवून १२% लाभांश देण्यास पाठिंबा दर्शविला.

ठराव क्र. ४ : सन २०१६-२०१७ या वर्षात निव्वळ नफा **₹**२०,०१,५७,६७६.०० इतका झाला आहे. संचालक मंडळाने नफा वाटणीस पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे. ती **मा. संचालक श्री. मोहन आघारकर** यांनी सभेसमोर मांडली. सदर नफा वाटणीस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच धर्मादाय निधीचे वितरण करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

(₹)

| | |
|---|---|
| निव्वळ नफा / Net Profit | २०,०१,५७,६७६.०० |
| + लाभांश मधील जादा तरतूद / + excess Div. Provision | १५,७६,९७४.०० |
| मागील शिल्लक / Previous Balance | ४४,८४१.०० |
| गुंतवणूक वध घट निधी (अतिरिक्त) / Investment Fluctuation Fund | ६,२०,००,०००.०० |
| सर्वसाधारण मुक्त निधी / General Free Reserve Fund | ५,००,००,०००.०० |
| **एकूण / Total** | **३१,३७,७९,४९१.००** |
| **वाटणी** | |
| राखीव निधी २५% / Reserve Fund २५% | ५,०१,००,०००.०० |
| सर्वसाधारण मुक्त निधी १०% / General Free Reserve Fund १०% | २,०१,००,०००.०० |
| राष्ट्रीय सहकार शिक्षण निधी १% / National Co-operative Education fund १% | २०,०१,६००.०० |
| लाभांश @१२% / Dividend @१२% | ८,०६,००,०००.०० |
| धर्मादाय निधी १% / Charity Fund १% | २०,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी / Shareholder Welfare Fund | १०,००,०००.०० |
| महोत्सव निधी / Mahotsav Fund | २५,००,०००.०० |
| कर्मचारी सानुग्रह अनुदान / Ex-gratia to Employees | २,०६,००,०००.०० |
| निवडणूक निधी / Election Fund | ७,००,०००.०० |
| शैक्षणिक निधी / Education Fund | १०,००,०००.०० |
| बुडीत व संशयित निधी / Bad and Doubtful Fund | १३,३१,००,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक / Balance C/F | ७७,८९१.०० |
| **एकूण / Total** | **३१,३७,७९,४९१.००** |

सूचक : श्री. सतिश बाळाजी कोकणे सभासद क्र. ५१०७१
अनुमोदक : श्री. अरुण प. बागलाणे सभासद क्र. २९५९९
ठराव बहुमताने मंजूर.

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक सी. ए. महेश्वर मराठे यांना सांगितले.

**विषय : सन २०१७-१८ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.**

सन २०१७ - १८ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव **मा. संचालक सी. ए. महेश्वर मराठे** यांनी सभेपुढे मांडला.

ठराव क्र. ५ : सन २०१७-१८ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव **मा. संचालक सी. ए. महेश्वर मराठे** यांनी सभेपुढे मांडला. मे. किर्तने अँड पंडीत एल.एल. पी ही फर्म बँकेच्या पॅनलवरील असून मल्टीस्टेट को-ऑप.सोसायटीज् ॲक्टच्या कलम ७२ नुसार सर्व अटी पूर्ण करीत आहे. तसेच ते पुनर्नियुक्तीकरता पात्र आहेत. त्यांचा मेहेनताना शासकीय नियमानुसार संचालक मंडळाने ठरवावा.

मल्टीस्टेट सहकारी कायदा २००२ च्या कलम ७० आणि सध्या लागू असलेल्या इतर तरतुदींनुसार सन २०१७-१८ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता, या वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपासून पुढील वर्षी म्हणजे सन २०१८ मध्ये होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मे. किर्तने अँड पंडीत एल. एल. पी यांची नेमणूक करण्यास व नियमानुसार त्यांचा मेहेनताना देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. अनंत लक्ष्मणराव पाटील | सभासद क्र. ३२९६६ |
| अनुमोदक : | डॉ. संतोष कुलकर्णी | सभासद क्र. १६२९० |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. हेमंत दरगोडे यांना सांगितले.

**विषय : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.**

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार आहेत व त्याची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, असे श्री. दरगोडे यांनी सांगितले.

ठराव क्र. ६ : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबतचा ठराव **मा. संचालक श्री. हेमंत दरगोडे** यांनी सभेपुढे मांडला.

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आहेत व त्यांची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. अनिल जयराम पांचाळ | सभासद क्र. १४५४ |
| अनुमोदक : | कुसुम देवीदास सोनार | सभासद क्र. ३०४९७ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालिका सौ. पुष्पा कदम यांना सांगितले.

**विषय :** **संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक असलेल्या बँकेच्या कर्मचाऱ्यांची नोंद घेणे.**

ठराव क्र. ७ : संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक असलेल्या बँकेच्या कर्मचाऱ्यांची नावे **मा. संचालिका सौ. पुष्पा कदम** यांनी सभेपुढे वाचून दाखविली. संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक असलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यास अहवाल सालात बँकेमध्ये कंत्राटी अथवा स्थायी स्वरुपाची नेमणूक केलेली नाही. परंतु बँकेच्या पटलावर स्थायी स्वरुपात बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कनिष्ठ बंधू श्री. राजेश नारायण खिरवडकर हे उपव्यवस्थापक या पदावर दि. ०१.०१.२०१२ पासून कार्यरत आहेत. याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. एकनाथ कोंडाजी वाघ | सभासद क्र. १०७९८ |
| अनुमोदक : | सौ. मौसमी मुखर्जी | सभासद क्र. ४८८३१ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. रमेश गोरे यांना सांगितले.

**विषय :** **या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**

ठराव क्र. ८ : या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याचा ठराव मा. संचालक श्री. रमेश गोरे यांनी सभेपुढे मांडला. अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती ही सभा क्षमापित करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. गजानन त्रिंबक पटवर्धन | सभासद क्र. ३०६४४ |
| अनुमोदक : | श्री. विजय महादेव भोईर | सभासद क्र. ६३३४३ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

विषय पत्रिकेवरील सर्व विषय संपल्याने मा. अध्यक्षांनी आभार प्रदर्शन करण्याबाबत बँकेचे उपाध्यक्ष मा. मधुसूदन पाटील यांना सूचित केले.

मा. उपाध्यक्ष श्री. मधुसूदन पाटील यांनी सर्व सभासदांचे आभार मानले. काही सभासदांनी उपयुक्त सूचना दिल्या याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सभेसाठी हॉल उपलब्ध करुन देणारे नवरंग बँक्वेट हॉलचे व्यवस्थापक व सभेचे चित्रीकरण करणारे श्री. श्रीनिवास लेले, ध्वनीव्यवस्थापक मे. प्रकाश साऊंड सर्व्हिसेस् यांचे आभार मानले. बँकेचे एक्झिक्युटिव्ह, अधिकारी, कर्मचारी यांना देखील धन्यवाद दिले.

यानंतर मा. अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.